नियमीत दिवाणी दावा क्र ०४/२०२०.
नि. क्र. १९

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री वाय. एच. उपराडे यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु–**

११. हे म्हणणे खरे आहे की, घर भाडे सोडून विद्युत आकार वेगळे देण्याचे ठरले होते. मी भाडेकरु असतांना एक हॉल, एक बेडरुम व एक किचन माझ्या ताब्यात होते. मी एकुण १५ महीने भाडेकरु म्हणून होतो. पंधरावा महीना सुरु झाल्यानंतर मी मिळकत सोडलेली होती. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी एकुण १४ महीने व ७ दिवस त्या मिळकतीत राहीलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी नियमीतपणे भाडे व विद्युत आकार देत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आमच्यामध्ये वाद झाले होते. प्रतिवादीने बँकेमध्ये माझ्या विरुध्द तक्रार दिलेली होती. साक्षीदार सांगतो की, मी मिळकत सोडल्यानंतर नोव्हेंबर २०१८ मध्ये तक्रार दिलेली होती. मी दिनांक ११ ऑक्टोंबर २०१८ रोजी मिळकत सोडलेली होती. ऑक्टोबर २०१८ पासुन मला एचआरए मिळायचे बंद झाले होते.

१२. मी विद्युत बिल नेमके किती दिले हे मला आता आठवत नाही. मी विद्युत बिल दिल्याबाबतची कागदपत्रे माझ्याजवळ आहेत. मी ती अभिलेखावर दाखल केलेली नाहीत. रक्कम रुपये १,१२,०५०/– ईतकी रक्कम प्रतिवादीला दिली हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याजवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, रक्कम रुपये ६०००/– प्रमाणे १३ महीन्यांचे ७८,०००/– ईतकी रक्कम होते. हे म्हणणे खरे आहे की, मी १३ महीन्यांचे भाडे म्हणुन रक्कम रुपये ६५०००/– दिले. हे म्हणणे खरे आहे की, मी रक्कम रुपये १३०००/– कमी दिले होते.

१३. हे म्हणणे खरे आहे की, १५ महीन्यांचे एकुण रक्कम रुपये ९००००/– देणे लागत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला एकुण ८४०००/– दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला मी रक्कम रुपये ६०००/– देणे बाकी आहे. मी रक्कम रुपये १,१२,०५०/–ईतकी रक्कम दिली असे सांगत आहे त्यामध्ये विद्युत बिलाची रक्कम समाविष्ठ

नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला रक्कम रुपये १,१२,०५०/– कधीही दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला जास्तीचे रक्कम रुपये २२,०५०/– दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकुर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**स्वा/–**
**(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांकः– ०८/०८/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आमगांव.**